**<u>स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)</u>**
**OD Watch- शहरांमध्ये हागणदारी होत नाही याबाबत घ्यावयाची दक्षता.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : स्वमअ-२०१७/प्र. क्र. ७३/नवि-३४**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग
४ था मजला, मंत्रालय, मुंबई
दिनांक : १ सप्टेंबर, २०१७.

**<u>पहा :</u>**
१. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांक स्वभाअ २०१५/प्र.क्र.२३/नवि-३४, दिनांक १५ मे, २०१५.
२. स्वच्छ महाराष्ट्र अभियान संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक राअसं/कार्यान्वयन सूचना/४२/१५-१६ दिनांक २८ जुलै, २०१५.
३. शासन परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१७/प्र.क्र. ३१/नवि-३४, दिनांक १७ मार्च, २०१७.
४. शासन निर्णय, नगर विकास विभाग समक्रमांक, दिनांक १८ मे, २०१७.
५. शासन परिपत्रक, क्रमांक स्वमअ-२०१७/प्र.क्र. ७४/नवि-३४, दिनांक २३ मे, २०१७.
६. शासन परिपत्रक, क्रमांक स्वमअ-२०१५/प्र.क्र. २४८/नवि-३४, दिनांक १६ ऑगस्ट, २०१७.
७. शासन परिपत्रक क्रमांक एमसीओ २०१५/प्र.क्र. ३०९/नवि-१४, दिनांक १९ मे, २०१७.

**<u>परिपत्रक</u>**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी दिनांक १५ मे, २०१५ पासून संपूर्ण राज्यात "मिशन मोड" पध्दतीने सुरू आहे. या अभियानांतर्गत शहरे हागणदारी मुक्त करणे व घनकचरा व्यवस्थानातंर्गत **"स्वच्छ"** करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे. या अभियानांतर्गत कार्यवाही करून दिनांक २ ऑक्टोबर, २०१५ पासून टप्याटप्याने शहरे हागणदारी मुक्त करण्याची कार्यवाही सुरू झाली असून, दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ रोजी राज्याचा संपूर्ण नागरी भाग हागणदारी मुक्त होण्याच्या मार्गावर आहे.

२. मागील दोन वर्षाच्या कालावधीत हागणदारी मुक्त झालेल्या शहरांमध्ये काही प्रमाणात हागणदारी आढळण्याची शक्यता नाकारता येत नाही. हि बाब विचारात घेवून व दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ रोजी राज्याचा नागरी भाग खऱ्या अर्थाने हागणदारी मुक्त म्हणून जाहिर करण्याच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

## (I) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावर करावयाची कार्यवाही:

### (१) "गुड मॉर्निंग व गुड इव्हिनिंग" पथके कर्यान्वित करण्याबाबत:

- शहरे हागणदारी मुक्त करण्यासाठी प्रत्येक शहरांने उघड्यावरील हागणदारीची ठिकाणे (OD spots) निष्कासीत करण्यासाठी "गुड मॉर्निंग व गुड इव्हिनिंग" पथके कार्यरत करण्याबाबतच्या सूचना दिनांक १८ मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. या "गुड मॉर्निंग व गुड इव्हिनिंग" पथकांनी अधिक सक्रीय होवून दररोज पूर्ण कार्यक्षमतेने कार्य करणे आवश्यक आहे.
- नगरपरिषद / नगरपंचायत मुख्याधिकाऱ्यांनी त्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणीच वास्तव्य करणे अनिवार्य असल्याबाबतच्या सूचना दिनांक १९ मे, २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्रातील "गुड मॉर्निंग व गुड इव्हिनिंग" पथकामध्ये मुख्याधिकाऱ्यांनी स्वत: सहभागी होणे आवश्यक आहे.
- "क" व "ड" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या "गुड मॉर्निंग व गुड इव्हिनिंग" पथकामध्ये संबंधित महानगरपालिकेच्या आयुक्तांनी स्वत: उपस्थित राहणे आवश्यक आहे.
- तर, "अ" व "ब" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उप आयुक्त / सहायक आयुक्त यांनी स्वत: "गुड मॉर्निंग व गुड इव्हिनिंग" पथकामध्ये सहभागी होणे आवश्यक आहे.
- या "गुड मॉर्निंग व गुड इव्हिनिंग" पथकांमध्ये महापौर / नगराध्यक्ष व संबंधित वार्ड / प्रभागाचे नगरसेवक यांनाही वेळोवेळी सहभागी करून घेण्यात यावे.
- शहरे हागणदारी मुक्त करताना संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने हे काम चोख पणे केले असल्यास "गुड मॉर्निंग व गुड इव्हिनिंग" पथकास शहरात हागणदारी व उघडयावर शौच करणाऱ्या व्यक्ती आढळून येणार नाही. अशा वेळेस "No OD seen" असा अहवाल संबंधित आयुक्तांनी अतिरिक्त आयुक्त / उपायुक्त यांच्या कडून माहिती घेवून स्वत: Swacha Maharashtra या व्हाटसअप ग्रुपवर व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत यांनी विभागीय व्हाटसअप ग्रुपवर दररोज सकाळी ११.०० वाजेपर्यंत अपलोड करावा.

- अशा प्रकारे शहर स्तरावर कार्यरत करण्यात आलेल्या “गुड मॉर्निंग व गुड इव्हिनिंग” पथकास हागणदारी अथवा उघडयावर शौच करणाऱ्या व्यक्ती आढळून आल्यास त्या अनुषंगाने तात्काळ उपाययोजना करण्यात याव्यात. त्यानुसार “OD seen” व त्यावरील उपाययोजनांचा वस्तूस्थिती दर्शक अहवाल संबंधित आयुक्तांनी अतिरिक्त आयुक्त / उपायुक्त यांच्या कडून माहिती घेवून स्वत: Swacha Maharashtra या व्हाटसअप ग्रुपवर व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत यांनी विभागीय व्हाटसअप ग्रुपवर दररोज सकाळी ११.०० वाजेपर्यंत अपलोड करावा.

(२) <u>सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांमधील आवश्यक सुविधा :</u>

- शहरामधील सामुदायीक / सार्वजनिक शौचालये असलेल्या ठिकाणाचा परिसर हा बहुतांश वेळा गलिच्छ असतो व लाभार्थ्यास या शौचालयापर्यंत सुलभतेने पोहचताही येत नाही. त्यामुळे, शहरातील सामुदायिक/सार्वजनिक शौचालयांपर्यंत लाभार्थी कुटुंबांना सुलभतेने पोहचणे शक्य व्हावे यासाठी तेथील आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवून सामुदायीक / सार्वजनिक शौचालया पर्यंत पोहचण्यासाठी चांगला मार्ग उपलब्ध करून देण्यात यावा.
- शहरातील सामुदायिक/सार्वजनिक शौचालयात विजेची व मुबलक पाण्याची उपलब्धता करून देण्यात यावी.
- शहरातील सामुदायिक/सार्वजनिक शौचालयांचे दरवाजे व शौचकुपाची भांडी सुस्थितीत व वापरण्यायोग्य असावीत.
- शहरातील सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांमध्ये उपरोक्त प्रमाणे आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या असून ही सामुदायीक / सार्वजनिक शौचालये सध्या वापरायोग्य असल्याबाबतचा अहवाल संबंधित आयुक्तांनी अतिरिक्त आयुक्त / उपायुक्त यांच्या कडून माहिती घेवून स्वत: Swacha Maharashtra या व्हाटसअप ग्रुपवर व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत यांनी विभागीय व्हाटसअप ग्रुपवर दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ पर्यंत अपलोड करावा.

(३) <u>सामुदायीक / सार्वजनिक शौचालयांची देखभाल :</u>

- शहरातील सामुदायीक/सार्वजनिक शौचालयांची नियमितपणे देखभाल करण्यासाठी सुयोग्य अशा संस्थां सोबत करार करून देखभालीची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात यावी असे करताना शहरातील महिला बचत गटांचा प्राधान्याने विचार करावा.

(४) <u>वैयक्तीक घरगुती शौचालयाचे उद्दिष्ट :</u>

- स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचा कालावधी हा दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी लाभार्थी कुटुंबांना वैयक्तीक शौचालय, सामुदायीक शौचालये व सार्वजनिक शौचालये उपलब्ध करून देवून शहरे हागणदारी मुक्त केली आहेत. शहर हागणदारी मुक्त झाल्यानंतर शहरातील जास्तीत जास्त पात्र लाभार्थी कुटुंबांना वैयक्तीक शौचालयांची सुविधा उपलब्ध करून देऊन शहरे ODF+ व ODF++ करावयाची आहेत.
- ज्या शहरांमधील वैयक्तीक शौचालयांचे बांधकाम शहराच्या एकूण उद्दिष्टापैकी ७० % पेक्षा कमी साध्य झाले असेल, अशा शहरांनी पुढील एक महिन्याच्या कालावधीत हे उद्दिष्ट किमान ७० % पर्यंत पूर्ण होईल या दृष्टिने कार्यवाही करावी.
- पूर्ण झालेल्या वैयक्तीक शौचालय बांधकामाचे जीओ -टॅग फोटो केंद्र शासनाच्या वेबसाईटवर तात्काळ अपलोड करण्याची कार्यवाही करावी.
- काही शहरांमध्ये वैयक्तीक शौचालयांची बांधकामे पूर्ण झाली आहेत परंतु त्यांचे जीओ -टॅग फोटो केंद्र शासनाच्या वेबसाईटवर अपलोड केलेले नाहीत, अशा शहरांनी विशेष मोहिम राबवून किमान ७०% जीओ-टॅग फोटो केंद्र शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करावेत.

(II) <u>जिल्हा प्रशासन अधिकारी यांच्यास्तरावर करावयाची कार्यवाही:</u>

- सदर शासन निर्णय संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा.
- संबंधित जिल्हा प्रशासन अधिकारी यांनी जिल्हयातील नगरपरिषदा / नगरपंचायतीं पैकी किमान एक-दोन नगरपरिषदांच्या / नगरपंचायतींच्या "गुड मॉर्निंग व गुड इव्हिनिंग"

पथकामध्ये दररोज सहभागी व्हावे व त्याचा अहवाल (No OD seen / OD seen) विभागीय व्हाटसअप ग्रुपवर दररोज सकाळी ११.०० वाजेपर्यंत अपलोड करावा.

- जिल्हयातील हागणदारी मुक्त झालेल्या शहरांनी “हागणदारी मुक्त शहर” हा आपला दर्जा कायम राखल्याबाबत प्रमाणीत करून तसा अहवाल दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ पर्यत सादर करावा.
- जिल्हयातील हागणदारी मुक्त झालेल्या शहरांपैकी काही शहरांमध्ये हागणदारी (OD) अथवा उघडयावर शौच करणाऱ्या व्यक्ती आढळून आल्यास त्या अनुषंगाने तात्काळ उपाययोजना करण्यात याव्यात.

(III) <u>प्रादेशिक उपसंचालक, नगरपालिका प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय यांच्यास्तरावर करावयाची कार्यवाही:</u>

- संबंधित प्रादेशिक उपसंचालक, नगरपालिका प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय यांनी विभागातील जे जिल्हे हागणदारी मुक्त कार्यक्रमामध्ये अडचणीचे (Critical) आहेत अशा जिल्हयांमधील नगरपरिषदा / नगरपंचायतींपैकी किमान एक-दोन नगरपरिषदांच्या / नगरपंचायतींच्या “गुड मॉर्निंग व गुड इव्हिनिंग” पथकामध्ये त्यांनी स्वत: दररोज सहभागी व्हावे व त्याबाबतचा वस्तूस्थिती दर्शक अहवाल विभागीय व्हाटसअप ग्रुपवर दररोज सकाळी ११.०० वाजेपर्यंत अपलोड करावा.
- विभागातील सर्व शहरांचे अहवाल (No OD seen / OD seen) विभागीय व्हाटसअप ग्रुपवर दररोज सकाळी ११.०० वाजेपर्यंत अपलोड होतील याची दक्षता घ्यावी व विभागाचा अहवाल संकलित करून तो मा. प्रधान सचिवांच्या व्हाटसअपवर त्याच दिवशी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अपलोड करावा.
- विभागातील सर्व शहरातील सामुदायीक / सार्वजनिक शौचालया पर्यंत पोहचण्यासाठी चांगला मार्ग, शौचालयांमध्ये वीज, पाणी इत्यादी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या असून ही सामुदायीक / सार्वजनिक शौचालये सध्या वापरायोग्य आहेत असे प्रमाणीत करून त्याबाबतचा अहवाल विभागीय व्हाटसअप ग्रुपवर दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ पर्यंत अपलोड करावा.

- विभागातील सर्व शहरांमधील वैयक्तीक शौचालय बांधकामाचे किमान ७० % जीओ-टॅग फोटो केंद्र शासनाच्या वेबसाईटवर अपलोड होतील या बाबत दक्षता घ्यावी.

**(IV) <u>आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन, यांच्या कार्यालयातील उपसंचालक / सहायक संचालक यांच्यास्तरावर करावयाची कार्यवाही:</u>**

- आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन यांच्या कार्यालयातील उप संचालक / सहायक संचालक यांनी, त्यांना नेमून दिलेल्या विभागातील हागणदारी मुक्त कार्यक्रमामध्ये अडचणीचे (Critical) असलेल्या काही नगरपारिषदा / नगरपंचायतींच्या "गुड मॉर्निंग व गुड इव्हिनिंग" पथकामध्ये आठवडयातून किमान दोन दिवस सहभागी व्हावे व त्याबाबतचा वस्तूस्थिती दर्शक अहवाल विभागीय व्हाटसअप ग्रुपवर सकाळी ११.०० वाजेपर्यंत अपलोड करावा.
- विभागातील सर्व शहरांचे अहवाल (No OD seen / OD seen) विभागीय व्हाटसअप ग्रुपवर दररोज सकाळी ११.०० वाजेपर्यंत अपलोड होतील याची दक्षता प्रादेशिक उपसंचालक, नगरपालिका प्रशासन यांच्या सहाय्याने घ्यावी.
- विभागातील सर्व शहरातील सामुदायीक / सार्वजनिक शौचालया पर्यंत पोहचण्यासाठी चांगला मार्ग वीज, पाणी इत्यादी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या असून ही सामुदायीक / सार्वजनिक शौचालये सध्या वापरायोग्य आहेत असे प्रमाणीत करून त्याबाबतचा अहवाल विभागीय व्हाटसअप ग्रुपवर दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ पर्यंत अपलोड करावा.
- विभागातील सर्व शहरांमधील वैयक्तीक शौचालय बांधकामाचे किमान ७० % जीओ-टॅग फोटो केंद्र शासनाच्या वेबसाईटवर अपलोड होतील या बाबत दक्षता घ्यावी.

**(V) <u>जिल्हाधिकारी यांच्यास्तरावर करावयाची कार्यवाही:</u>**

- उपरोक्त (I), (II) व (III) अन्वये दिलेल्या सविस्तर सूचनांचे आपल्या जिल्हयातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था काटेकोरपणे पालन करतील याची दक्षता घेण्यात यावी.
- जिल्हयातील हागणदारी मुक्त झालेल्या शहरांनी "हागणदारी मुक्त शहर" हा आपला दर्जा कायम राखल्याबाबत प्रमाणीत करून तसा अहवाल दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ पर्यत सादर करावा.

**(VI) जिल्हाधिकारी यांनी स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या अंमलबजावणी बाबत जिल्हयाचे पालकमंत्री यांना अवगत करणे:**

- शहरे हागणदारी मुक्त करण्यासाठी आतापर्यंत केलेले प्रयत्न व जिल्हयातील हागणदारी मुक्त झालेली शहरे याबाबतची संपूर्ण माहिती संबंधित जिल्हयाच्या पालकमंत्री महोदयांना जिल्हाधिकारी यांनी प्रत्यक्ष भेटून दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ पर्यंत द्यावी व त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

३. विभागीय समन्वयक व विभागीय सल्लागार पुढील प्रमाणे राहतील:-

| अ.क्र. | विभाग | विभागीय समन्वयक ( Divisional Level Coordinator) | विभागीय सल्लागार ( Divisional Mentor) |
|---|---|---|---|
| १. | कोकण विभाग | कु. मानसी रानडे | श्रीमती सीमा ढमढेरे |
| २. | पुणे विभाग | कु. मृदुला मंकीकर | |
| ३. | नाशिक विभाग | श्रीमती मधुरा मायंदे | श्री. सुधाकर बोबडे |
| ४. | औरंगाबाद विभाग | श्रीमती स्मीता झगडे | |
| ५. | अमरावती विभाग | श्री. सुहास चव्हाण | श्री. उदय टेकाळे |
| ६. | नागपूर विभाग | कु. धनश्री झेंडे | |

४. वरील सूचनांची अंमलबजवणी दिनांक १ सप्टेंबर, २०१७ पासून सर्व शहरांनी काटेकोरपणे करून प्रत्येक शहराने हागणदारी मुक्त शहर हा आपला दर्जा कायम राखला पाहिजे. जी शहरे “हागणदारी मुक्त शहर” हा आपला दर्जा कायम राखणार नाहीत त्या शहरांना सन २०१७-१८ या आर्थीक वर्षात शासनाकडून देण्यात येणाऱ्या विकास कामासाठीचा निधी देण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

५. स्वच्छ भारत अभियान हा मा. पंतप्रधान व मा. मुख्यमंत्री महोदयांचा फ्लॅगशिप कार्यक्रम आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची सर्व संबंधितानी दक्षता घ्यावी, अन्यथा संबंधितांवर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घेण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९०११८०८३८७४२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhakar
Dnyandeo Bobade

Digitally signed by Sudhakar Dnyandeo Bobade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bc1634ab95abe4652ec2433f0ccd505c20ea3e7ecad3bfcb55d49ad9dbd0fe5e, serialNumber=2e4705465b9bdfd5b38b2d36aae83659869796cb8cc2aefbc550989feec27db1, cn=Sudhakar Dnyandeo Bobade
Date: 2017.09.01 17:58:34 +05'30'

**(सुधाकर ज्ञा. बोबडे)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा .मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव (सर्व), मंत्रालय, मुंबई
४. मा .राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व), मंत्रालय, मुंबई
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
६. विभागीय आयुक्त, महसूल विभाग (सर्व).
७. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
८. जिल्हाधिकारी, सर्व
९. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
१०. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व).
११. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई.
१२. निवडनस्ती, नवि-३४.